

नांगनूर : येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना डी. के. गायकवाड. उपस्थित सुप्रिया कांबळे यांच्यासह मान्यवर.

# पूरपरिस्थितीतून बाहेर निघूया : डी. के. गायकवाड

**हलकर्णी / प्रतिनिधी :**
मराठवाड्यातील शेतकरी दुष्काळ, पाणीटंचाई याचा सामना करत जगतो आहे, तर आपल्याकडे या वर्षी पाण्याने गंभीर परिस्थिती निर्माण केली आहे. महापुरामुळे झालेली हानी आणि मनात निर्माण झालेली भीती भयावह आहे. गावासाठी कोणतीही मदत लागली तर सांगा, विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पुरवली जाईल. विद्यार्थ्यांकडून उर्वरित कामे पूर्ण करू. शैक्षणिक मदत हवी असेल तर पुरवली जाईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांनी केले.

नांगनूर (ता. गडहिंग्लज) येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या वतीने आयोजित पूरग्रस्त भागातील समूहासाठी मदत व पुनर्वसन शिबिराच्या सांगता समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सरपंच सुप्रिया कांबळे होत्या.

डॉ. डी. के. गायकवाड यांच्या हस्ते वृक्षारोपणाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. दीपक सोनवणे यांनी शिबिराचा उद्देश व राष्ट्रीय सेवा योजनामधील विद्यार्थ्यांनी गावात राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शालेय माहिती दिली. यावेळी पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शालेय कीट व कुटुंबांना धान्याचे वाटप करण्यात आले. डी. जी. चिघळीकर, उपसरपंच विकास मोकाशी, प्राचार्य सुरेश चव्हाण, दिग्विजय कुराडे, आप्पासाहेब परीट, खणदाळ सरपंच रेणुका चिरमुरे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास दीपक सोनवणे, माधव कदम, मोहिनी उपासणी, पंचशीला वाघमारे, एम. ए. शिंदे, साताप्पा तेरदाळे, सातगोंडा चौगुले यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. हर्षदा सोनवणे, अजय वाघ यांनी सूत्रसंचालन केले. माधव कदम यांनी आभार मानले.



राधानगरी : येथील कॉलेजमध्ये पैलवानांचा गौरव करताना सुशील पाटील-कौलवकर. सोबत इतर.

# विद्यापीठ कुस्ती स्पर्धेत राधानगरी महाविद्यालय चॅम्पियन

**राधानगरी (प्रतिनिधी) :** युवराज पाटील कुस्ती संकुल, कुडित्रे (ता. करवीर) येथे पार पडलेल्या शिवाजी विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धेत राधानगरी महाविद्यालयाने ४ सुवर्णपदक पटकावलीत. कुस्तीमधील प्रतिष्ठेचा चषक आणि जनरल चॅम्पियनशिप मिळवली. क्रीडा क्षेत्रात चमकदार कामगिरी केलेल्या राधानगरी महाविद्यालयातील पैलवान मंडळींनी शिवाजी विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी बजावली. ओंकार लाड (५७ किलो) प्रथम, कुलदीप पाटील (६१ किलो) प्रथम, प्रतीक म्हेतर (७० किलो) प्रथम आणि ओंकार पाटील (९२ किलो) प्रथम. अशा चार वजनी गटांत पदक मिळवून हे सर्व खेळाडू आंतर विभागीय स्पर्धेस पात्र झाले आहेत. विजेत्या संघातील कुस्तीपटू यांचा सत्कार राधानगरी कॉलेजचे प्राचार्य मोरुस्कर, शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष सुशील पाटील- कौलवकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कॉलेजमधील प्राध्यापक व इतर मान्यवर उपस्थित होते.

# देशातील प्रत्येक राज्यात 'रवळनाथ'ने पोहोचावे

## गडहिंग्लज येथील प्रधान कार्यालय इमारत उद्‌घाटनप्रसंगी डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांचे प्रतिपादन

**गडहिंग्लज / प्रतिनिधी :**

रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीने अतिशय संघर्षातून सचोटीने पारदर्शीपणे व्यवहार करत माणसे जोडली आहेत. अवघ्या २३ वर्षांत घेतलेली गरुडझेप चित्तथरारक आहे. या संस्थेने केवळ कर्नाटक आणि महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता देशातील प्रत्येक राज्यात पोहोचावे आणि तेथील नागरिकांचे घरकुलांचे स्वप्न पूर्ण करावे, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

रवळनाथ फायनान्स सोसायटीच्या गडहिंग्लज येथील प्रधान कार्यालय इमारत उद्‌घाटन व ज्ञान प्रबोधिनी संचालित झेप ॲकॅडमीच्या सौ. मीना बसवराज रिंगणे अभ्यासिकेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा स्वाती कोरी होत्या.

संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी स्वागत करून प्रास्ताविकातून संस्थेच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या



गडहिंग्लज : मीना रिंगणे अभ्यासिकेचे उद्‌घाटन करताना डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, एम. एल. चौगुले, स्वाती कोरी, डॉ. दत्ता पाटील आदी.

घडामोडींचा इतिहास उपस्थितांसमोर मांडला. डॉ. दत्ता पाटील यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

यावेळी डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, स्वाती कोरी, मीना रिंगणे, महेश मजती, संदीप कागवाडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. बी. एस. पाटील यांनी शुभेच्छा संदेश वाचन केले.

डॉ. देशमुख म्हणाले, एम. एल. चौगले व रवळनाथच्या संचालक व सदस्यांसह कर्मचाऱ्यांनी अतिशय प्रामाणिकपणे व विश्वासार्हता जपण्याचे काम केले आहे. केवळ व्यावसायिक दृष्टिकोन न ठेवता एखाद्या समाजातील गरीब अथवा गरजू व्यक्तीला मदत हवी असल्यास रवळनाथ कुटुंब त्या ठिकाणी सर्वप्रथम पोहोचते, ही समाजाच्या दृष्टीने आदर्शाची गोष्ट आहे. गरजूंना घरकुलासाठी विनाविलंब आर्थिक साहाय्य करण्यात रवळनाथचा हातखंडा आहे. घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी रवळनाथने केलेले काम महत्त्वाचे आहे. देशात आर्थिक मंदी आहे; पण रवळनाथने योग्य नियोजनपूर्वक कारभार केल्यामुळे मंदीचा प्रश्न उद्‌भवत नाही. निश्चित धोरण या संस्थेच्या संचालकांकडे असून, संस्थेने अल्पावधीत विश्वासार्हता मिळवली आहे. रवळनाथने झेप ॲकॅडमीमार्फत केवळ स्पर्धा परीक्षेचे नियोजन न करता अगदी दहावीपासून पुढील सर्व परीक्षांचे मार्गदर्शन करावे.

प्र. कुलगरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, अतिशय सुंदर काम एम. एल. चौगुले व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे. रवळनाथने सव्वादोनशे कोटी रुपयांच्या ठेवीचा टप्पा पार केला आहे. गडहिंग्लज, आजरा, चंदगड या उपविभागातील अभ्यासिकेची गरज रवळनाथने पूर्ण केली आहे.

मीना रिंगणे म्हणाल्या, समाजाचे काही तरी आपण देणे लागतो त्यासाठी योग्य ठिकाणी मदत, दान करणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय मनोगतातून प्रा. स्वाती कोरी म्हणाल्या, गडहिंग्लज, आजरा, चंदगड तालुक्यांत कुठेही कोणाचेही नुकसान झाले तर त्या ठिकाणी शक्य असेल तेवढ्या आर्थिक मदतीचा धनादेश घेऊन रवळनाथ कुटुंब सर्वप्रथम पोहोचलेले असते. गडहिंग्लज शहरात वृक्ष लावले असून, संरक्षण करण्यासाठी रवळनाथने लोखंडी कुंपण घातलेले आहे. शिवाय महापुरात गरजूंना मदत म्हणून रवळनाथने भरघोस आर्थिक मदत देऊन पाच घरकुले बांधून देण्याचा निश्चय केला आहे.

कार्यक्रमास रवळनाथचे विविध शाखांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, सदस्य, कर्मचारी, हितचिंतक, मान्यवर, सभासद उपस्थित होते. डॉ. समिधा चौगुले यांनी पसायदान म्हटले. किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संजीवनी पाटील यांनी आभार मानले.

### जम्बो सत्कारातून कौतुकाची थाप

एखाद्याला मदत करणे किंवा एखाद्याच्या पाठीवर कौतुकाची थाप मारणे हे रवळनाथचे वैशिष्ट्य. प्रधान कार्यालय इमारत बांधकामात मदत झालेल्या सर्वांचाच जम्बो सत्कार करून त्यांच्यावर कौतुकाची थाप मारण्याची संस्कृती रवळनाथने जपली. यामध्ये महेश चौगुले, भास्कर पाटील, सचिन बेनाडे, वीरपाक्ष खुर्द, वीरेंद्र पाटील, विशाल गड्डी, संजय कोलेकर, शिवकुमार साव्यान्नावर, विजय नेसरकर, बाबूलाल सुतार, किरण साळुंखे, प्रदीप देशमुख, बरकतअली पासा, प्रेमाराम सुतार, अविनाश पाटील, अमोल परीट, मयूर देशमुख यांचा सत्कार केला.